नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

हिंगोली कृषी हवामान सल्ला

शुक्रवार दिनांक – १४.०२.२०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२०)				
दिनांक	१५/०२	१६/०२	१७/०२	१८/०२	१९/०२
पाऊस (मिमी)	००.०	००.०	००.०	००.०	००.०
कमाल तापमान (अं.से.)	३३.०	३३.०	३४.०	३३.०	३३.०
किमान तापमान (अं.से.)	१६.०	१६.०	१७.०	१८.०	१९.०
ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	३९	३०	२९	२८	३१
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	१९	१५	१६	१७	१९
वा-याचा वेग (किमी / तास)	०६	११	०६	०८	०९
वा-याची दिशा	ईशान्य	पुर्व	पुर्व	पुर्व	आग्नेय

हवामानाचा इशारा	जिल्ह्यात पुढील पाच दिवसात आकाश स्वच्छ राहील.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
हरभरा	वाढीची अवस्था	उशिरा पेरणी केलेल्या हरभरा पिकात घाटे भरण्याच्या अवस्थेत पिकास पाणी दयावे. हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के ४०० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ८० ग्रॅम प्रती एकर फवारणी करावी.
गहु	वाढीची अवस्था	उशिरा पेरणी केलेल्या गहु पिकात दाणे भरण्याचा अवस्थेत पिकास पाणी दयावे. गहु पिकावरील खोड माशीच्या व्यवस्थापनासाठी सायपरमेथ्रीन १० % ईसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
ऊस	वाढीची अवस्था	ऊस पिकात पांढरी माशीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास हेक्टरी २ ते ३ ट्रायकोकार्ड १० दिवसाच्या अंतराने ४ ते ६ वेळा वापरावे. तसेच याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % ३० मिली किंवा फिप्रोनील ५ % ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
हळद	कंद वाढीची अवस्था	हळद पिकाची लागवड करून नऊ महिन्याचा कालावधी झाला असल्यास पाणी तोडावे.
संत्रा /मोसंबी	फळ वाढीची अवस्था	संत्रा / मोसंबी फळबागेत खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसुन येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी प्रादुर्भाव झालेल्या झाडाच्या जुन्या वाळलेल्या फांदया काढुन टाकाव्यात. मुख्य खोडालगत भुसा दिसुन आल्यास तारेच्या आकडयाने आतील आळया काढून नष्ट कराव्यात व छिद्रामध्ये पेट्रोलमध्ये बुडविलेला बोळा किंवा क्लोरपायरीफॉस द्रावणाचा (२ मिली प्रती लिटर पाणी) बोळा टाकावा व छिद्र शेणाने अथवा मातीने लिपून घ्यावे.
डाळिंब		आंबेबहार धरलेल्या डाळिंब फळबागेत तणव्यवस्थापन करून पाणीव्यवस्थापन करावे. तसेच बागेतील फुटवे काढावेत.

फुल शेती	कळया लागणे अवस्था	फुलपिकात पाण्याचा ताण बसणार नाही याची दक्षता घ्यावी.
भाजीपाला	फळवाढीची अवस्था	टोमॅटो भाजीपाला पिकावरील विषाणूजन्य बोकडया रोगाच्या व्यवस्थापनासाठी फेन्प्रोपेथ्रीन ३० टक्के ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
चारा पिके	वाढीची अवस्था	सध्या हिरवा चारा उपलब्ध असल्यास त्यापासून मुरघास तयार करून ठेवावा किंवा पाणी उपलब्ध असल्यास चारा उत्पादन घेऊन मुरघास तयार करून ठेवावा. जेणेकरून हा तयार केलेला मुरघास उन्हाळयात चाराटंचाईच्या काळात वापरता येईल.
तृती रेशीम उद्योग		अंडीफुटून अळी बाहेर येण्याच्या तारखेच्या दोन दिवस अगोदर मेनयुक्त कागदावर २ X ३ फुट आकाराच्या प्लॉस्टिक ट्रे मध्ये अंडी उबवण फ्रेममध्ये अंडीपुंज्य ठेवावेत आणि वरतुन मेनयुक्त कागद टाकावा व काळया कपडयाने ४८ तास लपेटून हालचाल नकरता अंडीपुंज्य ठेवावेत. याकाळात तापमान २५ अंशसेल्सिअस आणि आर्द्रता ६५ टक्के असावी. अंडी फुटून अळया ९५ टक्के बाहेर आल्यानंतरच कोवळी तुती पाने बतयीच्या साहयाने कापून खादय दयावे.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.